Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन नं. ०२४२७-२३८०९३
Email : shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

दि- ०१/१०/२०२६

दरपत्रक सूचना

प्रति,

.....

.....

श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर करिता गोशाळा विभागासाठी चाऱ्यासाठी मका मुरघास खरेदी करिता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अ.नं.	वर्णन	(मागणी टन) अंदाजित	दर प्रति टन (सर्व करांसह)	एकुण रक्कम
१	मका मुरघास गुणवत्ता तपशिल १. मका मुरघासाचा रंग पिवळसर, तपकिरी किंवा हिरवा असावा. २. मुरघासामध्ये योग्य ओलावा असावा. ३. मुघासामध्ये बुरशी नसावी.	१८०	अ. पुरवठादार यांच्या पाँकिंगसह मुरघास पोहच करणे. दर प्रति टन-	
			ब. संथेच्या बॅगमध्ये मोकळा मुरघास भरून देणे. दर प्रति टन-	

अटी व शर्ती –

१. सदरचे सीलबंद दरपत्रक दि – ०७/१०/२०२६ रोजी साय. ५ वाजेपर्यंत संस्थानचे आवक विभागाकडे दिलेल्या वेळेत पोहोच करावे.
२. सदर पाकीटावर " देवस्थानचे गोशाळा विभागाकरिता चाऱ्यासाठी मका मुरघास खरेदीबाबत दरपत्रक " असा स्पष्ट उल्लेख करावा.
३. दरपत्रक सादर करताना पॅनकार्ड सादर करणे अनिवार्य राहील.

A. दरपत्रकात दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. दरपत्रकात दिलेले वर्णन, दर्जा, कालावधी, दरपत्रकातील अटी-शर्ती, शिंगणापूरचे गोशाळा विभाग येथे मका मुरघास पोहोच करणे व हमाली, वाराई, वाहतूक खर्च, मार्केट सेस, मापाई वगैरे सर्व बाबींचा दरपत्रकधारकाने काळजीपुर्वक अभ्यास करून दर भरावेत.
२. दरासंबंधीचा दरपत्रकात दर भरताना काळजीपुर्वक भरावेत. याबाबत दर कमी नमुद केले आहेत किंवा दराबाबतची कुठलीही विनंती कुठल्याही परिस्थितीत ग्राह्य धरली जाणार नाही.

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन नं. ०२४२७-२३८०९३
Email : shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

B. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे त्याचे दरपत्रक मंजूर होईल त्यांना विहीत मुदतीत चाऱ्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरकडे ठेवावी लागेल. दरपत्रक मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरित सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरीत्या सदर चाऱ्याचा पुरवठा केलेनंतर आपण मागणी पत्र दिल्यानंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. दरपत्रक मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित NEFT/RTGS/ रोखीने भरावी लागेल. तसेच शिंगणापूर येथे समक्ष येऊन रु.५००/- चे stamp पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास अदा करावी लागेल. करारनामा केल्याशिवाय बील अदा केले जाणार नाही.

C. चारा पुरवठा करावयाचे ठिकाण व धोरण-

१. दरपत्रकात नमूद केलेल्या मका मुरघास पुरवठा शिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरचे गोशाळा विभागामध्ये करावा लागेल.

D. चारा पुरवठा करण्याची मुदत व पुरवठा करण्याची कार्यपध्दती-

१. दरपत्रकधारकास ऑक्टोबर २०२६ ते सप्टेंबर २०२७ कालावधी करिता चाऱ्यासाठी मका मुरघास पुरवणेसाठी दरपत्रक सादर करावे लागेल.

२. दरपत्रक मंजुर झालेनंतर चांगल्या दर्जाचा मका मुरघास पुरवावा लागेल. खराब मका मुरघास स्विकारला जाणार नाही. अशा चाऱ्याचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तत्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर जबाबदार राहणार नाही.

३. प्रत्येक आठवडयात दोन वेळेस (सोमवार व गुरुवार) अगर देवस्थान गोशाळा धोरणानुसार गरजेप्रमाणे चाऱ्याची मागणी केली जाईल. श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरचे गोशाळा, विभागाकडील गरजेनुसार चारा पुरवावा लागेल.

४. गोशाळा विभागातील गायींची संख्या व शेती विभागातील चारा उपलब्धता यावर अवलंबून असल्यामुळे चारा मागणी दरपत्रकामध्ये अंदाजे नमुद करण्यात आलेली आहे. तथापी दरपत्रक कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा चाऱ्याची मागणी श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरकडून झाल्यास त्या चाऱ्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेला सर्व चारा घेणे श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरवर बंधनकारक राहणार नाही.

५. गोशाळेत पुरविणेत येणारा मका मुरघास वाहतुकीमध्ये खराब होणार नाही अशी काळजी घेऊन त्या पद्धतीने पुरवावयाचा आहे.

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन नं. ०२४२७-२३८०९३
Email : shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

६. श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरचे गोशाळेतील प्रमुख पुरवठा आदेशात दिलेल्या वर्णनाप्रमाणे मका मुरघास तपासणी करतील व ताब्यात घेतील. मका मुरघास स्विकारणेबाबत विभागप्रमुख, गोशाळा यांचा निर्णय अंतिम राहील.

७. चारा पुरविणेची मागणी गोशाळा विभागाकडून तीन दिवस अगोदर देण्यात येईल व त्यामध्ये दिलेले Schedule प्रमाणे चारा पुरवठा करावा लागेल.

८. पुरविणेत येणारा मका मुरघास ताजा व चांगल्या दर्जाचा असावा. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेला मका मुरघास कमी प्रतीचा आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील. तसेच किड असलेला चारा स्विकारला जाणार नाही.

९. मका मुरघास पुरवठा आदेशाच्या बदली पुरवठाधारकाने दुसरा मुरघास पुरविल्यास तो स्वीकारला जाणार नाही.

E. बील अदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या चाऱ्याचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच अदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. चाऱ्याचे बील श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरकडे सादर केलेपासून १५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला अदा करण्याचा प्रयत्न राहिल. मात्र तांत्रिक अडचणींमुळे बील अदायगीस विलंब झाला तरीही संस्थानने मागणी केलेल्या चाऱ्याचा पुरवठा थांबविता येणार नाही.

३. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे चाऱ्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणे बील सादर करावे.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

F. विशेष अटी शर्ती/सुचना-.

१. L-1 दर निश्चित करताना जर एका पेक्षा जास्त दरपत्रकधारकांचे दर सारखे आले तर खरेदी समितीचे अध्यक्ष व सदस्य सर्वतोपरी विचार करून जो निर्णय घेतील तो निर्णय अंतिम राहील.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो नेवासा कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. कोणतेही अगर सर्व दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखुन ठेवलेला आहे.

४. श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूरने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळ्या यादीत समावेश केले जाईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. पुरवठाधारकाने चारा दर्जा, वर्णनाप्रमाणे व डिलेव्हरी शेडयूलप्रमाणे पुरविला नाही तर श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर पर्यायी चारा उपलब्धतेसाठी सदर करार रद्द करील व याकामीचे अतिरिक्त खर्चाची वसुली संबंधित पुरवठाधारकाकडून करील व अटी/शर्तींचा भंग झाल्यामुळे उचित कारवाई संस्थानमार्फत करण्यात येईल.

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन नं. ०२४२७-२३८०९३
Email : shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

६. सदरील साहित्याची खरेदी तत्काळ परिस्थितीमध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे दरपत्रक दि. ०८ /१०/ २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता उघडण्यात येऊन तत्काळ पुरवठा आदेश देण्यात येईल. सदरील आदेशानुसार आपणांस तत्काळ सदरील साहित्य पुरवठा करावयाचे आहे. सदरील प्रक्रियेदरम्यान आपण देवस्थान प्रशासकीय कार्यालय, शिंगणापूर येथे उपस्थित रहावे.

मा. प्रशासक तथा विभागीय आयुक्त
नाशिक यांचे मान्यतेने.

Digitally signed by
ATUL PANDIT CHORMARE
Date: 01-10-2026
14:18:34

श्री. अतुल चोरमारे,
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१ तथा कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शनिशिंगणापूर